RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ३२ (३)] शुक्रवार, मार्च १, २०२४/फाल्गुन ११, शके १९४५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११५**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ मार्च, २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२१/प्र.क्र.१५२/रस्ते-८.—महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६५) याच्या कलम २० ची पोट-कलम (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड) आणि (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याला समर्थनीय करणाऱ्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या (नागपूर - मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग) किलोमीटर ६००/१२८ ते ६२५/००० मधील महामार्ग व त्याचे जोडरस्ते, पोच रस्ते व यांवरील वळण रस्ते, उड्डाण पूल, पूल व बोगदे यांचा भागशः वापर करणाऱ्या सोबतच्या अनुसूची-१ च्या मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर वाहन प्रकार निहाय प्रती किलोमीटर प्रमाणे त्यांच्या खालील विनिर्दिष्ट केलेल्या दराने ४ मार्च, २०२४ पासून १० डिसेंबर २०३२, या कालावधीसाठी अनुसुची-२ मधील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पथकर स्थानकांवर स्तंभ (३) मध्ये त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या साखळी क्रमांक प्रमाणे पथकर आकारण्यात येत आहे.

## अनुसूची - १

| अ.क्र. (१) | कालावधी (२) | वाहनांचा प्रकार (३) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मोटार, जीप, व्हॅन अथवा हलकी मोटार वाहने (अ) | हलकी व्यावसायिक वाहने, हलकी मालवाहतुकीची वाहने अथवा मिनी बस (ब) | बस अथवा ट्रक (२ आसांची) (क) | तीन आसांची व्यावसायिक वाहने (ड) | अवजड बांधकाम यंत्रसामग्री (एचसीएम) अथवा अनेक आसांची वाहने (एमएव्ही) (चार अथवा सहा आसांची) (इ) | अति अवजड वाहने (सात किंवा जास्त आसांची) (फ) |
| | | किलोमीटर अंतराचा वापर कालावधी ०४/०३/२०२४ ते १०/१२/२०३२ | | | | | |
| १. | ०४/०३/२०२४ ते ३१.०३.२०२५ | रु. १.७३ | रु. २.७९ | रु. ५.८५ | रु. ६.३८ | रु. ९.१८ | रु. ११.१७ |
| २. | ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२८ | रु. २.०६ | रु. ३.३२ | रु. ६.९७ | रु. ७.६० | रु. १०.९३ | रु. १३.३० |
| ३. | ०१.०४.२०२८ ते ३१.०३.२०३१ | रु. २.४५ | रु. ३.९६ | रु. ८.३० | रु. ९.०५ | रु. १३.०२ | रु. १५.८४ |
| ४. | ०१.०४.२०३१ ते १०.१२.२०३२ | रु. २.९२ | रु. ४.७१ | रु. ९.८८ | रु. १०.७८ | रु. १५.५१ | रु. १८.८७ |

## अनुसूची - २

| अनुक्रमांक (१) | पथकर स्थानकाचे नाव (२) | साखळी क्रमांक (३) |
|---|---|---|
| २१. | पिंपरी सद्रुधीन | ६२५/००० |

**स्पष्टीकरण :-**

(अ) "मोटार" अथवा "जीप" अथवा "व्हॅन" अथवा "हलके मोटार वाहन" म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्याचे एकूण वजन सात हजार पाचशे कि.ग्रॅ. पेक्षा जास्त नसेल अथवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये निर्धारित केलेली नोंदणीकृत प्रवासी क्षमता चालक वगळता बारा पेक्षा जास्त नसेल.

(ब) "हलके व्यावसायिक वाहन" अथवा "हलके मालवाहू वाहन" अथवा "मिनी बस" म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्याचे एकूण वजन सात हजार पाचशे कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा जास्त परंतु बारा हजार कि.ग्रॅ. पेक्षा कमी असेल अथवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये निर्धारित केलेली नोंदणीकृत प्रवासी क्षमता चालक वगळून बारापेक्षा जास्त परंतु बत्तीसपेक्षा जास्त नसेल.

(क) “ट्रक” अथवा “बस” म्हणजे कोणतेही यांत्रिकी वाहन ज्याचे एकूण वजन बारा हजार कि.ग्रॅ. पेक्षा जास्त परंतु वीस हजार कि.ग्रॅ. पेक्षा कमी असेल अथवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्रामध्ये निर्धारित केलेली नोंदणीकृत प्रवासी क्षमता चालक वगळून बत्तीस पेक्षा जास्त असेल.

(ड) “तीन आसांचे वाहन” म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्यास तीन आस (ट्रेलर असल्यास अशा ट्रेलरच्या आसासह) असतील व ज्याचे एकूण वजन पंचवीस हजार कि.ग्रॅ. अथवा त्यापेक्षा कमी असेल.

(इ) “अवजड बांधकाम यंत्रसामग्री” अथवा “जमीन खोदाई यंत्रसामग्री” अथवा “अधिक आसांचे वाहन” म्हणजे अवजड बांधकाम यंत्रसामग्री अथवा जमीन खोदाई यंत्रसामग्री अथवा चार ते सहा आसांचे वाहन अथवा असे वाहन (ट्रेलर असल्यास अशा ट्रेलरच्या आसासह) ज्याचे एकूण वजन पंचवीस हजार कि.ग्रॅ. पेक्षा जास्त परंतु साठ हजार कि.ग्रॅ. पेक्षा कमी असेल.

(फ) “अतिअवजड वाहन” म्हणजे कोणतेही यांत्रिक वाहन ज्यास सात अथवा अधिक आस असतील अथवा ज्याचे एकूण वजन साठ हजार कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा जास्त असेल.

**टिप्पणी:-**

१. खालील प्रकारच्या वाहनांना पथकरातून सूट देण्यात येईल—

(अ) अतिमहत्वाचे व्यक्तीचे वाहन आणि सोबतची वाहने—

(*i*) भारताचे राष्ट्रपती ;

(*ii*) भारताचे उप राष्ट्रपती ;

(*iii*) भारताचे पंतप्रधान ;

(*iv*) भारताचे मुख्य न्यायाधीश ;

(*v*) राज्यपाल ;

(*vi*) उप राज्यपाल ;

(*vii*) केंद्रीय मंत्री ;

(*viii*) मुख्यमंत्री ;

(*ix*) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ;

(*x*) लोकसभेचे सभापती आणि राज्यसभेचे अध्यक्ष ;

(*xi*) राज्याच्या विधानपरिषदेचे सभापती ;

(*xii*) राज्याच्या विधानसभेचे अध्यक्ष ;

(*xiii*) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ;

(*xiv*) उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ;

(*xv*) राज्य मंत्रीमंडळातील मंत्री ;

(*xvi*) राज्य दौऱ्यावरील परदेशी मान्यवर ;

(*xvii*) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधान परिषदेचे विद्यमान सदस्य ;

(*xviii*) महाराष्ट्रातील माजी संसद सदस्य व माजी महाराष्ट्र विधानसभा सदस्य किंवा माजी महाराष्ट्र विधान परिषद सदस्य ;

(ब) कार्यालयीन कामकाजाकरिता वापरण्यात येणारी वाहने —

(*i*) लष्कराची वाहने ;

(*ii*) केंद्र आणि राज्य सशस्त्र सेना दलाची निमलष्करी दलासह गणवेश परिधान केलेले आणि पोलीस विभागाची गणवेश परिधान केलेले ;

(*iii*) अग्निशमक दलाची वाहने ;

(*iv*) पोस्ट आणि तार विभाग ;

(*v*) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाची तपासणी आणि देखरेख करणारे अधिकारी ;

(क) रुग्णवाहिका

(ड) शववाहिका

२. हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर (नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग) बैलगाडी अथवा पशुकडून ओढून नेली जाणारी वाहने, दोन चाकी, तीन चाकी वाहने, तसेच सहा आसणी ॲटोरिक्षा, ट्रॅक्टर यांना द्रुतगती मार्गावर प्रवेश करण्यास मनाई राहील.

३. या अधिसूचनेच्या प्रयोजनाकरिता हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील (नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग) उपरोल्लेखीत पथकर नाक्यावर वरील नमुद कालावधीकरिता पथकराची संपूर्ण रक्कम वसूल करण्याचा आणि ठेऊन घेण्याचा हक्क "नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग मर्यादित" यांना प्रदान करण्यात आला आहे.

४. पथकराची रक्कम वाहन धारकाने सदर रस्त्यावरुन प्रवास केलेले अंतर गुणिले सदर अधिसूचनेमध्ये प्रसिध्द केलेले त्या वाहन प्रकाराकरिताचे प्रती किलोमीटर पथकराचे दर याचा गुणाकार करून येणारी रक्कम नजिकच्या पाच रुपयाच्या पटीत येणाऱ्या रक्कमे एवढी असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिपाली भाईक,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 1st March, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No. PPP-2021/CR-152/Road-8.—In exercise of the powers conferred by sub- sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby declares that the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in the Schedule - I appended hereto and on the trailors drawn by such motor vehicles, passing over the section of the Hindu Hridayasamrat Balasaheb Thackeray Maharashtra Samruddhi Mahamarg (Nagpur-Mumbai Super Communication Expressway) in kilometers 600/128 to 625/000 and also the flyovers, bridges and tunnels constructed on the said section of the said road and approach roads and connectors thereto partly or fully, at the rates per kilometer specified against each of the said vehicles specified in Schedule-I, with effect from the 04th March, 2024 to the 10th December 2032, at toll collection centres specified in column (2) of the Schedule-II appended hereto constructed at the chainage Nos. specified against each of the said toll collection centres specified in column (3) of the Schedule-II on the said section of the said road.

*Schedule - I*

| Sr. No. (1) | Period (2) | Particulars of Motor Vehicles (3) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Car, Jeep, Van or Light Motor Vehicle (*a*) | Light Commercial Vehicle, Light Goods Vehicle or Mini Bus (*b*) | Bus or Truck (Two axles) (*c*) | Three-axle commercial Vehicles (*d*) | Heavy Construction Machinery (HCM) or Earth Moving Equipment (EME) or Multi Axle Vehicle (MAV) (Four to six axles) (*e*) | Oversized Vehicles or Multi Axle Vehicle (Seven or more axles) (*f*) |
| | | Rates of toll per kilometer (in rupees) for the period from 04-03-2024 to 10/12/2032 | | | | | |
| 1 | 04.03.2024 to 31.03.2025 | Rs. 1.73 | Rs. 2.79 | Rs. 5.85 | Rs. 6.38 | Rs. 9.18 | Rs. 11.17 |
| 2 | 01.04.2025 to 31.03.2028 | Rs. 2.06 | Rs. 3.32 | Rs. 6.97 | Rs. 7.60 | Rs. 10.93 | Rs. 13.30 |
| 3 | 01.04.2028 to 31.03.2031 | Rs. 2.45 | Rs. 3.96 | Rs. 8.30 | Rs. 9.05 | Rs. 13.02 | Rs. 15.84 |
| 4 | 01.04.2031 to 10.12.2032 | Rs. 2.92 | Rs. 4.71 | Rs. 9.88 | Rs. 10.78 | Rs. 15.51 | Rs. 18.87 |

*Schedule - II*

| Serial Nos. (1) | Name of Toll Collection Centres (2) | Chainage Nos. (3) |
|---|---|---|
| 21. | Pimpri Sadruddin | 625/000 |

*Explanation :-*

(*a*) **“car” or “jeep”** or **“van”** or **“light motor vehicle”** means any mechanical vehicle the gross vehicle weight of which does not exceed seven thousand five hundred kilogram or the registered passenger carrying capability as specified in certificate of registration issued under the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), but does not exceed twelve, excluding driver ;

(b) **“light commercial vehicle”** or **“light goods vehicle”** or **“mini bus”** means any mechanical vehicle with a gross vehicle weight equal to or exceeding seven thousand five hundred kilogram but less than twelve thousand kilograms or the registered passenger carrying capability as specified in the certificate of registration issued under the Motor Vehicles Act, 1988, exceed twelve but does not exceed thirty two, excluding the driver ;

(*c*) **“truck”** or **“bus”** means any mechanical vehicle with a gross vehicle weight exceeding twelve thousand kilogram but less than twenty thousand kilograms or the registered passenger carrying capability as specified in the certificate of registration issued under the Motor Vehicles Act, 1988, exceeds thirty two, excluding the driver ;

(*d*) **“three-axle vehicle”** means any mechanical vehicle with three-axles (inclusive of the axle of the trailer, if any) and with a gross vehicle weight, less than or equal to twenty five thousand kilogram ;

(*e*) **“heavy construction machinery”** or **“earth moving equipment”** or **“multi-axle vehicle”** means heavy construction machinery or earth moving equipment or mechanical vehicle including a multi-axle vehicle with four to six axles or vehicles (inclusive of the axle of the trailer, if any) with a gross vehicle weight exceeding twenty thousand kilogram but less than sixty thousand kilogram;

(*f*) **“oversized vehicle”** means any mechanical vehicle having seven or more axles or vehicle with a gross vehicle weight equal or greater than sixty thousand kilogram.

*Notes :-*

1. The following types of vehicles are exempted from payment of toll, namely :

(*a*) Vehicles transporting and accompanying,—

(*i*) the President of India ;

(*ii*) the Vice-President of India ;

(*iii*) the Prime Minister of India ;

(*iv*) the Chief Justice of India ;

(*v*) the Governor ;

(*vi*) the Lieutenant Governor ;

(*vii*) the Union Minister ;

(*viii*) the Chief Minister ;

(*ix*) the Judge of Supreme Court ;

(*x*) the Speaker of the House of People ;

(*xi*) the Chairman of the Legislative Council of the State ;

(*xii*) the Speaker of the Legislative Assembly of the State ;

(*xiii*) the Chief Justice of High Court ;

(*xiv*) the Judge of High Court ;

(*xv*) Ministers of the State Cabinet ;

(*xvi*) Foreign dignitaries on State visit ;

(*xvii*) the sitting members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council ;

(*xviii*) the ex-members of Parliament from Maharashtra, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council ;

(*b*) Vehicles used for official purposes by,—

(*i*) defence vehicle ;

(*ii*) the Central and State armed forces in uniform including para military forces and police in uniform ;

(*iii*) a fire-fighting department vehicles ;

(*iv*) Post and Telegraph Department ;

(*v*) officers inspecting and monitoring the Hindu Hridayasamrat Balasaheb Thackeray Maharashtra Samruddhi Mahamarg ;

(*c*) Ambulance.

(*d*) Hearses.

2. Non-propelled vehicles, two wheelers, three wheelers, six seater auto rickshaw, tractors are not permitted on Hindu Hridayasamrat Balasaheb Thackeray Maharashtra Samruddhi Mahamarg (Nagpur-Mumbai Super Communication Expressway).

3. For the purpose of this Notification the "Nagpur-Mumbai Super Communication Expressway Limited", is authorized to collect the toll at the abovementioned toll collection centres on Hindu Hridayasamrat Balasaheb Thackeray Maharashtra Samruddhi Mahamarg (Nagpur-Mumbai Super Communication Expressway) for above mentioned period and retain the amount of the toll.

4. Amount of toll levied shall be the multiplication of the distance travelled by the commuter on this road and the rate of toll per kilometer applicable for that category of vehicle rounded off to the nearest multiple of five rupees.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEEPALI BHAIK,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.